UGC Journal Details

Name of the Journal :	Research Journey
ISSN Number :	
e-ISSN Number :	23487143
Source:	UNIV
Subject:	Marathi
Publisher:	Swatidhan International Publication
Country of Publication:	India
Broad Subject Category:	Multidisciplinary

Print

Commerce & Science College, KVN Naik Arts, ★
IQAC OFFICE

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce
& Science College, Canada Corner,
Nashik-422 002.

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all
(https://www.ugc.ac.in/)

FAQs (https://www.ugc.ac.in/faq.aspx)
RTI (https://www.ugc.ac.in/subpage/RTI-Act.aspx)
Tenders (https://www.ugc.ac.in/Tenders.aspx)
Jobs (https://www.ugc.ac.in/ugc_jobs.aspx)
Press Release (https://www.ugc.ac.in/ugc_pressrelease.aspx)
Contact Us (https://www.ugc.ac.in/contact.aspx)
अ (https://www.ugc.ac.in/hindi/)

UGC Approved List of Journals

|| Home (journal_list.aspx) ||

You searched for **r**

Total Journals : 1436

Show 25 entries Search: Research journey

View	Sl.No.	Journal No	Title	Publisher	ISSN	E-ISSN
View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDA3MDU=)	1168	40705	Research Journey International E Research Journal	Swatidhan Pub. Yevla		23487143
View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDQxMTc=)	1220	44117	Research Journey	Swatidhan International Publication		23487143

Showing 1 to 2 of 2 entries (filtered from 1,436 total entries) Previous 1 Next

For UGC Officials

> e-Office (https://ugc.eoffice.gov.in/acl_users/credentials_cookie_auth/require_login?came_from=https%3A//ugc.eoffice.gov.in/)
> NIC mail (https://mail.gov.in/iwc_static/c11n/allDomain/layout/login_gov2.jsp?lang=en&3.0.1.2.0_15121607&svcs=abs,im,mail,smime,calendar,c11n)
> RTI online (https://rtionline.gov.in/RTIMIS/login/index.php)
> PG portal (https://pgportal.gov.in)

IQAC OFFICE
KVN Naik Arts, Commerce & Science College

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019 SPECIAL ISSUE- 117

Literature & Translation

Guest Editor:
Dr. B. S. Jagdale
Principal
MGV's Arts, Science & Commerce College,
Manmad, Dist. Nashik [M.S.] INDIA

Chief Editor :
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

Executive Editor of the issue :
Dr. P. G. Ambekar
Dr. V. T. Thorat
Dr. Shailaja Jaiswal
Prof. Mrs. Kavita Kakhandaki
Prof. J. P. Jondhale
Prof. M.M. Ahire
Dr. Mrs. Yogita Ghumare

ATTESTED

PRINCIPAL
LOKNETE GOPINATHJI MUNDE
nstitute of Engineering Education & Research
Canada Corner, Nashik-422 002

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February -2019 Special Issue – 117

Literature & Translation

Guest Editor:
Dr. B. S. Jagdale
Principal
MGV's Arts, Science & Commerce College,
Manmad, Dist. Nashik [M.S.] INDIA

Executive Editor of the issue:
Dr. P. G. Ambekar
Dr. V. T. Thorat
Dr. Shailaja Jaiswal
Prof. Mrs. Kavita Kakhandaki
Prof. J. P. Jondhale
Prof. M. M. Ahire
Dr. Mrs. Yogita Ghumare

Chief Editor:
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 117- Literature & Translation
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

Editorial Board

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

Co-Editors -

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik.
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Dr. Samjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.]**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.]**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.]**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.]**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.]**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.]**

Advisory Board -

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

Review Committee -

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

Published by –

© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

INDEX

No.	Title of the Paper	Author's Name	Page No.
	English Section		
1	Translation: Transformation of Socio-Cultural Ethos	Dr. G.A. Ghanshyam	05
2	Literature and Translation : An Overview	Dr. Sannabasanagouda G. Dollegoudar Patil	10
3	Onomatopoeia : Towards an Understanding of Some Observances	Dr. A. Kishore Kumar Reddy	15
4	Translation and Transcreation : The Enrichment of Indian English Literature	Dr. Vaibhav Sabnis	21
5	The Difficulties with Translation : Some Critical Observations	Dr. Leena Pandhare	25
6	Recent Kannada Literature and Translation	Dr. Kalyan Kokane & Mrs. Kavita Kakhandaki	27
7	A Critical Study of Marathi Autobiography *UPARA* Translated into English	Dr. Bharati S. Khairnar	31
8	Culture and Translation : A Brief Study of *Old Stone Mansion (Wada Chirebandi)*	Mr. Kishor Ahire	35
9	Adaptation : A New Language of Literary Translation	R.V. Tribhuvan	38
10	Translation : A Linguistic Study of the Text	Milind Ahire & Dr. Bharati Khairnar	41
11	The Anxiety of Authenticity in Literary Translation	Prof. Mukund Bhandari	44
12	The Task of the Translator in the Process of Translation.	Dr. Premal R. Deore	46
13	Mahesh Elkunchwar's *'The Old Stone Mansion'*: A Translated Work	Mr. Kamalakar Gaikwad	48
14	Understanding Machine Translation Technology	Prof. Swapnil Alhat	53
15	Organizing the Disorganized: Gulzar's Translation of Kusumagraj's poem "Kana"	Dr. Sandeep Wagh	57
	हिंदी विभाग		
16	साहित्यिक अनुवाद : काव्यानुवाद की समस्याएँ	प्रो. शकीला खानम	59
17	सूचना प्रौद्योगिकी में अनुवाद का महत्त्व , समस्याएँ और संभावनाएँ	डॉ. पूर्णिमा आर.	63
18	अनुवाद का महत्त्व	प्रो. नवनीत चौहान	67
19	अनुवाद एवं भाषायी एकता	डॉ. सरोज गुप्ता	69
20	अनुवाद विधा का विकास	डॉ. योगिता हिरे एवं डॉ. शैलजा जायसवाल	72
21	अनुप्रयुक्त विज्ञान अनुवाद : हिंदी का विस्तार	डॉ. राजनारायण अवस्थी	76
22	हिंदी साहित्य का अन्य भाषाओं में अनूदित साहित्य	डॉ. कृष्णकान्त मिश्र	81
23	अनुवाद साहित्य में सांस्कृतिक परिप्रेक्ष्य	डॉ. योगिता घुमरे (उशिर), डॉ.जालिंदर इंगले	86
24	अनुवाद की अवधारणा एवं रोजगार के अवसर	डॉ सुनीता कावले	89
25	मराठी से हिंदी में अनूदित लोकसाहित्य (लोकोक्ती, कहावते, मुहावरो के संदर्भ में)	प्रा. कैलास बच्छाव	92
26	अनुवाद सिद्धांत और प्रयोग	अविनाश के.	95
27	अनुवाद में तकनीकी भाषा का प्रयोग	डॉ. व्ही. डी. सूर्यवंशी	99
28	अनुवाद की प्रासंगिकता	डॉ. लोकेश्वर सिन्हा	102
29	हिंदी साहित्य में अनुवाद परम्परा विकास	डॉ. मिलिंदराज बुक्तुरे	105
30	वर्तमान परिप्रेक्ष्य में अनुवाद की उपादेयता	प्रा. रविंद्र ठाकरे	108

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 117- Literature & Translation
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

31	अनुवाद : परिभाषा और प्रक्रिया	प्रा.राजाराम शेवाले	111
32	विज्ञापन और अनुवाद	डॉ. योगेश दाणे	113
33	हिंदी साहित्य में अन्य भाषाओं से अनुदित साहित्य	डॉ. शोभा राणे	117
34	संत कान्होपात्रा के अभंगो में विठ्ठल भक्ति	डॉ. नवनाथ गाडेकर	120
35	हिंदी साहित्य में अन्य भाषाओं से अनुदित साहित्य	डॉ. अनिता वेताल – अत्रे	123
36	किशोर शांताबाई काले की आत्मकथा छोरा कोल्हाटी का : दर्द का दस्तावेज	डॉ. विष्णू राठोड	125
37	अनुवाद की समस्याएँ एवं उपाय	डॉ. मिनल बर्वे	128
38	अनुवाद : अनुवाद प्रक्रिया और अनुवादक के गुण	प्रा.आर.एन. वाकले	131
39	भूमण्डलीकरण युग में अनुवाद की उपयोगिता	संतोष पगार, डॉ.अशोक धुलधुले	134
40	अनुवाद का क्षेत्र और हिंदी	डॉ. जालिंदर इंगले, प्रा. संदिप देवरे	138
41	अनुवाद की अन्य क्षेत्रों में उपलब्धियाँ	प्रा. आर. जे. बहोत	142
42	अनुवाद प्रक्रिया एवं सृजनशीलता	डॉ. जालिंदर इंगले, जयश्री गायकवाड	145
43	हिंदी साहित्य में अनुवाद परम्परा	डॉ. जिजाबराव पाटील	148
44	मराठी से हिंदी में अनूदित सामग्री का त्रुटीविश्लेषण	श्रीमती. प्रिया कदम	151
45	प्राचीन बाल कथा साहित्य के अनुवाद में जीवन मूल्य	सागर चौधरी	154
46	अनुवाद कि अवधारणा एवं उनका क्षेत्र	डॉ. इल्यास जेठवा	157
47	अनुवाद : स्वरुप एवं धारणा	उज्वला अहिरे	163
	मराठी विभाग		
48	भाषांतर मीमांसा व विविध क्षेत्रीय भाषांतराचे स्वरूप	डॉ. सुधाकर शेलार	166
49	भाषांतर व अनुवाद : उगम, विकास आणि संधी	डॉ. राजेंद्र सांगळे	172
50	भाषांतरातील अडचणी आणि उपाययोजना	डॉ. मृणालिनी कामत	176
51	अनुवाद - भाषांतर - रुपांतर : संकल्पना आणि आवश्यकता	डॉ. विलास थोरात	182
52	शास्त्रीय साहित्याचे भाषांतर	डॉ. प्रमोद आंबेकर	187
53	अनुवाद संकल्पना व परंपरा	डॉ. भाऊसाहेब गमे	191
54	भाषांतर स्वरूप आणि संकल्पना	प्रा.ए.जी.नेरकर	195
55	भाषांतर : स्वरूप शोध	डॉ. आनंद वारके	200
56	भाषांतर स्वरूप आणि संकल्पना	प्रा. गजानन भामरे	204
57	अनुवाद- भाषांतर- रुपांतर : संज्ञा संकल्पना	डॉ. अरुण पाटील	208
58	भाषांतर संस्कृती	डॉ. स्नेहल मराठे	211
59	भाषांतराचे सांस्कृतिक सामाजिक योगदान	प्रा. विद्या बोरसे	214
60	भाषांतरातील सृजनशीलता	डॉ. आनंदा गांगुर्डे	218
61	साहित्य अकादमीचे अनुवादातील योगदान	डॉ. सुरेखा जाधव	221
62	भाषांतरातील सर्जनशीलता	प्रा. अनुराधा मोरे	225
63	भाषांतर : स्वरूप, प्रकार व कार्य	प्रा. युवराज भामरे	230
64	प्रसारमाध्यमे आणि भाषांतर	प्रा. भीमसेन आवटे	236

Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the paper on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.

- Chief & Executive Editor

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 117- Literature & Translation | February-2019
UGC Approved Journal

भाषांतर व अनुवाद : उगम, विकास आणि संधी

डॉ. राजेंद्र सांगळे
के.व्ही.एन.नाईक महाविद्यालय, नाशिक

प्रास्ताविक :

असं म्हटलं जातं की, 'जो दोन भाषा बोलू शकतो तो दोन माणसांची बरोबरी करतो.' भाषांतराचे आणि भाषातंरशास्त्राचे महत्व अधोरेखित करणारे हे वाक्य अगदीच खरे आहे. जागतिकीकरणाच्या या युगात सर्व देश आणि माणसे जशी एकमेकांच्या जवळ आली आहेत त्याप्रभाणेच जगातील अनेक भाषा आणि त्या त्या देशातील संस्कृती यांच्यातील संपर्क भाषांतर आणि अनुवाद यांच्या माध्यमातून अधिकाधिक दृढ होत आहे. या दृष्टीने भाषांतरशास्त्राला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. देशोदेशीच्या विविध भाषेतील कथा, कविता, नाटक, कादंबरी यासारखे साहित्य, वैज्ञानिक सिद्धांत, धार्मिक ग्रंथ, सामाजिक शास्त्रातील मौलिक विचार, थोरांची चरित्रे आणि इतर वैचारिक ज्ञान व माहिती यांचे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतरे होऊ लागल्याने भाषिक ज्ञानाच्या कक्षा दिवसेंदिवस विस्तारत आहे. ज्ञानलालसा आणि आर्थिक, सामाजिक गरजेतून परदेशातील अनेक चांगल्या कलाकृती आणि महत्वाच्या ग्रंथांचे जसे भारतीय भाषांमध्ये भाषांतरे व अनुवाद होत आहे. त्याचप्रमाणे भारतीय भाषांमधील अनेक चांगल्या साहित्यकृतींचे जगातील वेगवेगळ्या भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत.

भारत हा बहुभाषिक लोकांचा देश असल्याने प्रत्येक राज्याची वेगळी भाषा आणि वेगळी अशी सांस्कृतिक ओळख आहे. त्यामुळे भारतातील वेगवेगळ्या भाषांमधील श्रेष्ठ दर्जाची ग्रंथसंपदा राष्ट्रभाषा हिंदीसह देशातील इतर प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतरित होत असल्याने देशातील वेगवेगळय संस्कृतीचे आदान-प्रदान होत आहे. यामुळे देशाच्या विविध भाषांमधील प्रतिभावंत लेखक, कवी यांचे साहित्य मातृभाषेत वाचण्याचे भाग्य भारतीय वाचकांना लाभले आहे. म्हणूनच भाषांतर किंवा अनुवाद हे ज्ञानतृष्णा भागविण्याचे तसेच संस्कृती वहनाचे एक महत्वाचे माध्यम ठरत आहे.

एरिक याकोबसनच्या मते, " 'भाषांतर करणे' ही रोमन लोकांनी शोधलेली कला आहे." कला असून तिचा शोध रोमन लोकांनी लावला आहे."[१] पुढे वेगवेगळ्या टप्प्यांवर तिचा विकास होत गेला आणि ही कला व संकल्पना जगभर पसरली. सिसेरो आणि होरस या दोन रोमन विचारवंतांनी या संकल्पनेच्या विकासात पुढे महत्वाची भूमिका बजावली.

भाषांतर व अनुवाद :

इंग्रजीतील Translation या संज्ञेसाठी मराठीत भाषांतर अथवा अनुवाद हे शब्द वापरले जातात. मराठीत या दोन्हीही संज्ञा समानार्थी म्हणून वापरल्या जात असल्या तरी भाषांतर आणि अनुवाद यांच्यात बराच फरक आहे. एखाद्या भाषेतील शब्दाचा शब्दशः अर्थ देणे म्हणजे भाषांतर होय. या अर्थाने सरळ, साधी, तांत्रिक आणि मर्यादित अशी संकल्पना आहे. मात्र अनुवाद ही संकल्पना भाषांतराच्या तुलनेत बरीच व्यापक आहे. डॉ.कल्याण काळे म्हणतात त्याप्रमाणे, "अनुवाद ही व्यापक संज्ञा असून भाषांतर ही तिच्यात सामावणारी, तिच्या एका प्रकारचा निर्देश करणारी संज्ञा आहे."[२] मूळ भाषेतील मजकूर जेव्हा जसाच्या तसा लक्ष्य भाषेत आणला जातो तेव्हा त्यास भाषांतर म्हणतात तर मूळ भाषेतील मजकूर लक्ष्य भाषेत नेतअसतांना दोन्ही भाषेतील सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक संकेतानानुसार निर्माण झालेले भेद , स्थळ-काळानुसार ,धार्मिक रीतीरिवाज यामुळे निर्माण झालेले भेद लक्षात घेऊन मूळ आशयाला धक्का न लावता भाषिक व्यवस्थेच्या अंगाने केले जाणे रूपांतर म्हणजे खऱ्या अर्थाने अनुवाद होय. म्हणूनच अनुवादकाला केवळ मूळ व लक्ष भाषेचे वरवरचे ज्ञान असून चालत नाही तर त्यास दोन्ही भाषांचे व्याकरण, त्या भाषेतील लक्षार्थ, व्यंगार्थ, म्हणी व वाक्प्रचार , संस्कृती, धार्मिक परंपरा आणि रीतीरिवाज, लिंगव्यवस्था यांचे सूक्ष्म ज्ञान व आकलन असणे गरजेचे आहे. अन्यथा अर्थाचा अनर्थ होऊन भाषांतरात अडचणी निर्माण होण्याची शक्यता

ISSN : 2348-7143
February-2019

नाकारता येणार नाही. मराठीतील पुढील वाक्याचे इंग्रजीत भाषांतर करतांना येणाऱ्या संभाव्य अडचणी आपण लक्षात घेऊ.

उदा. – 'रानात सांग कानात आपले नाते, मी भल्या पहाटे येते'

या ओळीतील 'रान' , 'भली पहाट' या शब्दांसाठी इंग्रजीत पर्यायी शब्द देतांना किवा शोधतांना अनेक अडचणी निर्माण होतात. अशीच अडचण 'तो रामप्रहरी उठला आणि त्याने रानात जाऊन न्याहारी केली.' या वाक्याचे इंग्रजी भाषांतर करतांना येते. न्याहारी या शब्दास इंग्रजीत ब्रेकफास्ट असा प्रतिशब्द मिळतो मात्र 'रामप्रहरी' या शब्दास साजेसा असा इंग्रजी शब्द आपणास मिळत नाही. अशावेळी त्यातील आशय लक्षात घेऊन , आशयाला बाधा येणार नाही अशा दुसऱ्या शब्दांच्या सहायाने हा भाषिक व्यवहार अनुवादकास पूर्ण करावा लागतो. प्रत्येक भाषा ही तिच्या सांस्कृतिक संकेतांनी आणि नियमांनी बद्ध असते. अशावेळी भाषांतर करतांना भाषेच्या संबंधातील अशा स्वरूपाचे बारकावे माहित असणे खूप महत्वाचे असते. मराठीतील 'उष्टे' आणि 'खरकटे' या शब्दांना इंग्रजीत अचूक अर्थ दर्शविणारे पर्यायी शब्द उपलब्ध होत नाही. अशा वेळी भाषांतर करणे अडचणीचे होऊन जाते.एस्किमो लोकांच्या भाषेत बर्फासाठी वीस शब्द आहेत मात्र मराठीत केवळ बर्फ या एकाच शब्दाने काम चालवून घ्यावे लागते अशावेळी भाषांतर होते मात्र अनुवादावर मर्याद येते. असाच प्रकार इंग्रजीतील आणि मराठीतील नातेसंबध दर्शविणाऱ्या शब्दांच्या बाबतीत सांगता येईल. मराठीत प्रत्येक नात्यासाठी वेगवेगळे शब्द आहेत. जसे सख्खा भाऊ, चुलत भाऊ, मावसभाऊ, आतेभाऊ, मामेभाऊ इत्यादी. मात्र इंग्रजीत या सर्वांसाठी Cousin हा एकाच शब्द वापरला जातो. तेव्हा अनुवाद करतांना शैलीगत अर्थाच्या दृष्टीने मर्यादा येऊ शकतात.

भाषांतर हे तांत्रिक व एका विशिष्ठ चौकटीतील काम आहे तर अनुवाद हे सर्जनशील काम आहे. अनुवादकाच्या प्रतीभाशक्तीचा आणि व्यासंगाचा ठसा अनुवादावर ठळकपणे जाणवतो. उदा. संस्कृत मधील महाकवी कालिदासाच्या 'मेघदूत' चे मराठीत अनेक लेखकांनी भाषांतर व अनुवाद केला असला तरी यातील प्रत्येक अनुवाद हा पहिल्यापेक्षा भिन्न आणि वेगळा आहे. बऱ्याच वेळा मूळ कलाकृतीपेक्षा अनुवादित कलाकृती जास्त वाचली जाते.

भाषांतराचे प्रकार :

अशोक केळकर यांनी भाषांतराचे मूलनिष्ठ भाषांतर आणि लक्ष्यनिष्ठ भाषांतर असे दोन प्रकार सांगितले आहे. मूळ भाषेतील मजकूर जेव्हा शब्दशःलक्ष्य भाषेत भाषांतरित केला जातो तेव्हा त्यास मूलनिष्ठ भाषांतर म्हटले जाते. तर मूळ भाषेतील आशयाला महत्व देऊन मूळ मजकुराचे लक्ष्य भाषेतील स्वभावधर्मानुसार आणि व्याकरणिक व्यवस्थेनुसार भाषांतर केले त्यास लक्षनिष्ठ भाषांतर म्हटले जाते. उदा. ' 'हरिणाक्षी' या संस्कृत शब्दाचे मुलनिष्ठ भाषांतर 'हरिणाच्या डोळयासारखे डोळे असणारी स्त्री' असे मुळाला धरून भाषांतर केले जाते. तर लक्ष्यनिष्ठ भाषांतर होतांना ते 'सुंदर डोळयांची स्त्री' असे केले जाते." ३ मराठी विश्वकोशात भाषांतराचे कार्यानुसार छायानुवाद आणि भावानुवाद असे दोन प्रकार उदाहरणासह सांगितले आहे. छायानुवाद म्हणजे शब्दकोशाप्रमाणे फक्त शब्दाला शब्द देणे. तर भावानुवाद म्हणजे मूळ आशयाला धक्का न लावता शब्दाच्या विविध अर्थछटा आणि त्याचे सांस्कृतिक संदर्भ यांचा विचार करून आपल्या भाषेत आणणे. उदा. मराठीतील मामा या शब्दाचा छायानुवाद mother's brother असा होईल तर त्याचा भावानुवाद Uncle असा करावा लागेल.

भाषांतर युग :

सोळाव्या शतकात व्यापारासाठी आलेल्या इंग्रजांचे एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रावर राज्य प्रस्थापित झाले होते. इथल्या तुटपुंज्या ज्ञानउपलब्धतेवर कठोर टीका करून ब्रिटीश शिक्षणतज्ञ मेकॉलो याने पाश्चात्य विज्ञान व इंग्रजी भाषेचे शिक्षण देण्याचा विचार मांडला. ईस्ट इंडिया कंपनीच्या सेवेतील एल्फिन्स्टन या अधिकाऱ्याने येथील शिक्षणाची चांगली व्यवस्था निर्माण करण्यासाठी १८१५ साली 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' नावाची खाजगी संस्था आणि काही पाठशाला काढल्या. १८२० साली देशी भाषेतील ग्रंथनिर्मिती करून तिला उत्तेजन देणारी 'दि नेटिव्ह स्कूल अंड स्कूल बुक कमिटी' सुरु करून येथील शिक्षणाची व्यवस्था

लावण्याचे महत्वाचे काम केले. यातूनच पुढे १८५७ साली मुंबईसह , कलकत्ता आणि मद्रास येथे विद्यापीठांची स्थापना होऊन भारतीयांसाठी उच्च शिक्षणाची दारे खुली करण्यात आली. पाश्चात्य विचारवंताचा प्रभाव आणि त्याला मिळालेली मुद्रणकलेची जोड यामुळे मोठ्या प्रमाणात पुस्तके निघू लागली. साहजिकच या पुस्तकांचे स्वरूप सुरुवातीला भाषांतरित स्वरूपाचे होते. त्यामुळेच मराठीत १८०० ते १८७४ या कालखंडास भाषांतर युग म्हटले जाते. भाषांतर आणि रुपांतरासाठी पुण्यात 'डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीची' स्थापना होऊन अनेक विद्वानांना संस्कृत व इंग्रजी भाषेतील साहित्य मराठीत आणण्याची प्रेरणा मिळाली. आपल्या निबंधमालेतून भाषांतर या विषयावर दीर्घ लेख लिहून विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी या नव्या माध्यमाच्या चर्चेला सुरुवात केली. मराठीत सुरुवातीची भाषांतरे ही संस्कृत मधून मराठीत आणि नंतर इंग्रजी मधून मराठीत अशा क्रमाने झालेली दिसतात. श्रीकृष्णमिश्रपंडित यांच्या 'प्रबोधचंद्रोदय' या संस्कृत नाटकाच्या भाषांतराने मराठीत १८५१ मध्ये भाषांतराला सुरुवात झाली. यानंतर भास्कर दामोदर पाळंदे यांचे 'विक्रमोर्वशीय', परशुरामपंत गोडबोले यांचे 'वेणीसंहार' 'शाकुंतल', मृच्छकटिक', 'नागानंद', 'पार्वतीपरिनय', अशा संस्कृत नाटकांची मराठीत भाषांतरे झाली. पुढे ही परंपरा अधिकाधिक विकसित होत गेली आणि इंग्रजीतील अनेक चांगली अभिजात नाटके मराठीत भाषांतरित झाली तर काहींचे रूपांतर झाले. यात प्रामुख्याने शेक्सपिअरची 'अथेल्लो', ज्युलियस सीझर' ही नाटके होती. गोविंद बल्लाळ देवल यांनी शेक्सपिअर च्या अथेल्लो या नाटकाचे 'झुंजारराव' असे मराठी रूपांतरण केले. तर फ्रेंच नाटककार मोलीअर याच्या 'गानारेल' नाटकाच्या 'ऑल इन द रॉंग', या नाटकाचे 'संगीत संशयकल्लोळ' असे रुपांतर केले आणि ते रंगभूमीवर प्रचंड गाजले. १८७२ साली बंगाली या भारतीय भाषेतील 'नीलदर्पण' हे नाटक मराठीत भाषांतरित झाले. अशा रीतीने साहित्य विश्वात सुरु झालेला भाषांतराचा आणि अनुवादाचा हा प्रवास पुढे पुढे अधिकाधिक समृद्ध होत गेले. नवनव्या अनुवादकांनी ही परंपरा पुढे समृद्ध करण्याचे काम केले.

आज मराठीत अनेक विदेशी आणि प्रादेशिक भाषेतून अनेक चांगल्या व दर्जेदार साहित्यकृतींचे अनुवाद होत असून त्यामुळे भाषेच्या वैभवात निश्चितपणे भर पडत आहे. त्याचप्रमाणे मराठीतील अनेक चांगली ग्रंथसंपदा इतर भारतीय भाषांमध्ये आणि इंग्रजीसह इतर विदेशी भाषांमध्ये अनुवादित होत असल्याने मराठी साहित्य आणि संस्कृती सातासमुद्रापार पोहचली आहे. हेच अनुवादाचे खरे महत्व आहे. त्यामुळेच असे म्हटले जाते की, 'अनुवादित साहित्य हे एकेका साहित्यकृतीला, तिच्या निर्मात्याला, वैश्विक पुनर्जन्म प्रदान करीत असते.' या संदर्भात हिंदीतील प्रख्यात अनुवादक आणि समीक्षक डॉ.सूर्यनारायण रणसुभे म्हणतात की. " ज्या भाषेत जे मौलिक, उत्कृष्ट असते, त्याचे अनुवाद जर इतर भाषांत झाले नाहीत, केवळ त्या भाषेपर्यंतच ते जर मर्यादित राहिले तर इतर भाषांतील वाचक त्या मौलिकतेपासून दूरच राहतील." [४] याची प्रचीती अनेक चांगल्या पुस्तकांच्या अनुवादातून येते. इंग्रजी तसेच भारतातील प्रादेशिक भाषामधील कितीतरी चांगल्या कलाकृती मराठी भाषेत अनुवादित झाल्याने त्यातील आशय, विचार आणि संस्कृतीचा परिचय मराठी वाचकांना होत असतो. भाषांतर आणि अनुवादाची कला नसती तर शेक्सपिअर वाचण्यासाठी सगळ्या जगातील लोकांना इंग्रजी शिकावी लागली असती आणि होमरच्या महाकाव्याचा आस्वाद घेण्यासाठी लॅटिन भाषा शिकावी लागली असती. मात्र अनुवादामुळे आज हे प्रख्यात लेखक आणि त्यांच्या अजरामर साहित्यकृती तुमच्या मातृभाषेत उपलब्ध आहे. ही अनुवादाची मोठी उपलब्धी आणि देणगी आहे. वास्तविक बंगाली मधील जेष्ठ कवी रवींद्रनाथ टागोर, शरदचंद्र चटर्जी हे तर अनुवादकाच्या मध्ये अत्यंत लोकप्रिय असे साहित्यिक. कन्नड मधील ख्यातनाम साहित्यिक एस.एल.भैरप्पा यांच्या वंशवृक्ष, तडा, पर्व अशा प्रसिद्ध कादंबऱ्या मराठीत उमा कुलकर्णी यांनी अनुवादित केल्याने मराठी वाचकांना त्यांचा आस्वाद घेता आला. मराठीत १९६० नंतर प्रवाहित झालेल्या दलित साहित्याला जागतिक पातळीवर नेण्याचे काम फक्त अनुवादामुळे शक्य झाले. शरणकुमार लिंबाळे यांच्या 'अक्करमाशी' या आत्मकथनाचा प्रथम हिंदीत आणि नंतर इतर भारतीय भाषांमध्ये तसेच इंग्रजीत अनुवाद झाला. त्यानंतर बलुतं, आठवणींचे पक्षी, उचल्या यांचेही याच क्रमाने अनुवाद झाले. या सर्व प्रक्रियेत साहित्य अकादमी आणि नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया या संस्थांची धोरणे आणि सहभाग महत्वाचा ठरला आहे. एखाद्या भारतीय भाषेतील चांगल्या कलाकृतीचे देशातील इतर प्रादेशिक भाषेत अनुवाद करण्याचा त्यांचा उपक्रम आतिशय स्तुत्य आहे.

भाषांतर आणि आधुनिक साधने आणि संस्था :

खरे तर हा संपूर्ण मुद्दा एका दीर्घ निबंधाचा विषय होईल इतकी या क्षेत्रात लक्षणीय प्रगती झालेली आहे. गुगल या जगविख्यात कंपनीने स्वतःचे ट्रान्सलेशन टूल विकसित केले असून जगातील दीडशेच्या वर विविध भाषांमध्ये ते काम करते. दिलेल्या जागेत तुम्ही तुमच्या भाषेतील मजकूर टाकताच तुम्ही निवडलेल्या भाषेत तो मजकूर काही क्षणात तुम्हाला भाषांतरीत झालेला दिसून येतो. गुगल प्रमाणेच इतरही कंपन्यांनी आपल्या संगणक प्रणाली विकसित करून इन्टरनेट आणि संगणकाच्या सहाय्याने भाषांतराची सोय उपलब्ध करून दिली आहे. मोबाईलवर U-Dictionary नावाचे भाषांतर साधन (Translation Tool) उपलब्ध असून त्याद्वारे आपण इंग्रजी येत नसले तरी समोरच्या मित्राशी whatsaapp किंवा ईमेल वरून इंग्रजीत Chat करू शकतो. भारतीय भाषांसाठी काम करणाऱ्या अनेक संस्थांनी अशा प्रकारची साधने आपल्या संकेतस्थळांवरून मोफत उपलब्ध करून दिलेली आहे. जिज्ञासू आणि जाणकारांनी या साधनांचा निश्चितपणे चांगला उपयोग करणे गरजेचे वाटते.

भाषांतर आणि अनुवादासाठी अनेक संस्था शास्त्रीय पद्धतीने शिक्षण आणि प्रशिक्षण देण्याचे काम करतात. नवी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठ याबाबतीत आघाडीवर आहे. अनुवाद सेवा व शास्त्र आणि कलेचे पदव्युत्तर अभासक्रम या विद्यापीठातून शिकविला जातो. हैदराबाद येथील CIEFL ही संस्थाही भाषा प्रशिक्षण संस्था म्हणून काम करीत असतांना अनेक चांगले कोर्स राबवून या क्षेत्रात करियर करणाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करीत असते. जागतिक पातळीवर ऑक्सफर्ड प्रेस, ओरिएंट लॉगमन, स्री, पेंग्विन, सीगल या सारख्या नामांकित प्रकाशन संस्था दर्जेदार ग्रंथांचे अनुवाद करण्याचे काम करीत आहे. तर मराठीत मेहता पब्लिशिंग हाऊस हे इतर भाषेतील अनेक चांगल्या पुस्तकांचे मराठी भाषेत अनुवाद करीत असतात.

भाषांतर आणि अनुवाद ही एक सर्जनशील कला असल्याने तिला योग्य ते महत्व देणे गरजेचे आहे. "भाषांतर ही एक दुय्यम दर्जाची, जाता जाता करण्याची, कुणालाही सहजगत्या आपसूक येणारी गोष्ट आहे, असा समजही आढळतो." ५ मात्र हा मोठा गैरसमज असून तो दूर करणे गरजेचे आहे. कारण आज भाषांतरातील करियरच्या खूप मोठ्या संधी युवकांना खुणावीत आहे. परराष्ट्र खात्यात तर मौखिक आणि लिखित अनुवादासाठी बहुभाषा जाणकारांना प्रचंड मागणी असते. दुभाषक म्हणून येथे काम करण्याला खूप मोठी संधी आहे. आशीच संधी पर्यटन व्यवसायात सुद्धा आहे. डीजिटल मिडियात आज अनेक हॉलीवूड चित्रपट हिंदी आणि इतर प्रादेशिक भाषेत डब होतात तेव्हा त्यांना संपूर्ण चितपट त्या भाषेत भाषांतरित करावा लागतो. टी.व्ही.वरील डिस्कव्हरी सारख्या वाहिन्यांनी आता बहुभाषिक प्रक्षेपण सुरु केले आहे. तेथेही नोकरी आणि करीयरच्या अनेक संधी उपलब्ध आहे.

भाषांतर आणि अनुवादाच्या या क्षेत्रात काम करतांना एक मात्र नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की भाषांतर किंवा अनुवादात प्रामाणिकपणा, विश्वासार्हता आणि स्वाभाविकता या गोष्टींना खूप महत्व आहे. वाचक डोळे झाकून तुम्ही केलेल्या अनुवादावर विश्वास ठेवीत असतो अशा वेळी अर्थाचा अनर्थ होता कामा नये. यासाठी भाषांतरकाराने किंवा अनुवादकाने या कलेतील धोक्याची वळणे टाळली पाहिजे. कारण अनुवाद करतांना चुकूनही कोणत्याही भाषिक संस्कृतीचे, मूल्यांचे, धार्मिक परंपरांचे उल्लघन होता कामा नये.

संदर्भ :

1. सोमण अंजली, 'भाषांतरमीमांसा', प्रतिमा प्रकाशन , पुणे, पहिली आवृत्ती, १९९७, पृ.क्र.४२ .
2. काळे कल्याण,'भाषांतरमीमांसा', प्रतिमा प्रकाशन , पुणे, पहिली आवृत्ती, १९९७, पृ.क्र.०८.
3. तत्रैव, पृ.क्र. १५ .
4. डॉ.रणसुभे सुर्यनारायण, दलित साहित्यात अनुवादाची भूमिका, संपा.लिंबाळे शरणकुमार, 'भारतीय दलित साहित्य', साहित्य अकादमी, नवी दिल्ली, पहिली आवृत्ती, २०१३, पृ.क्र.१८५
5. प्रा.पंडित माया, दलित स्रीयांच्या लेखनाचे भाषांतर, , संपा.लिंबाळे शरणकुमार, 'भारतीय दलित साहित्य', साहित्य अकादमी, नवी दिल्ली, पहिली आवृत्ती, २०१३, पृ.क्र.१९२